# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

-----------------------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २०, १९४५ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) सहकार मंत्री** | |
| **(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(४) आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) कृषी मंत्री** | |
| **(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

-----------------------------------------------

### राज्यात दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१) * २१४०२ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पावसाच्या दिर्घ खंडामुळे दोन हजारांहून जास्त गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी पाऊस न झाल्याने मराठवाडा व विदर्भात दुष्काळसदृश्य परिस्थती निर्माण होऊन अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यात सोयाबीन आणि तूर आदी पिके करपली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८ हजार ६० पशुपालक शेतकऱ्यांनी चाऱ्यासाठी मोफत बियाणे देण्याबाबत जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने पीक परिस्थितीचा आढावा घेवून दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्यात दिनांक २८/०८/२०२३ अखेर एकूण ३६३ गांवे व १४०३ वाड्यांना ३८६ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत होता.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८,६१० पशुपालक शेतकऱ्यांनी वैरण पिकांच्या बियांण्यांची मागणी जिल्हापरिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे केली होती. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ८,६१० पशुपालक शेतकऱ्यांना रक्कम रुपये १२२.६९ लक्ष किंमतीचे ६०२.७० क्विंटल वैरण पिकांच्या बियांणांचे वितरण करण्यात आले आहे.

(४) याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ अन्वये राज्यात २४ तालुक्यांमध्ये गंभीर व १६ तालुक्यांमध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ अन्वये ज्या महसुली मंडळांमध्ये जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्यमानाच्या ७५% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा १०२१ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केली आहे. दुष्काळ जाहीर केलेल्या ४० तालुक्यांत व १०२१ महसुली मंडळात खालील सवलती लागू करण्यात आल्या आहेत :-

१) जमीन महसूलात सूट.

२) पीक कर्जाचे पुनर्गठन.

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.

४) कृषी पंपाच्या चालू वीज बिलात ३३.५% सूट.

५) शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची रक्कम मिळण्याबाबत

**(२) * २११५० श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रमेश कराड, श्री.सत्यजीत तांबे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम विदर्भात कमी पाऊस पडल्यामुळे तसेच मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव व सोलापूर इ. जिल्ह्यातील ५३४ मंडळापैकी ५०३ मंडळांमध्ये खरीप हंगामात २१ दिवसांपेक्षा जास्त दिवस पावसाचा खंड पडला असल्यामुळे पीक

विमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या २५ टक्के रक्कम आगाऊ देण्यासाठी राज्यातील १८ जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास अधिसूचना काढूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामातील पिके करपून गेली आहेत, तसेच पावसाअभावी राज्यातील ७० ते ९० टक्के पिकांचे नुकसान झालेले असताना बाधित शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून "१ रुपयात पीक विमा" योजनेंतर्गत २५% रक्कम विमा संरक्षित रक्कम म्हणून देण्याची नियमान्वये तरतूद असून त्यासाठी पावसाच्या २१ दिवसांच्या खंडाची (Break Period) अट आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संभाव्य उत्पादनात येणारी घट यावरही विमा कंपन्यांचा आक्षेप असून यासंदर्भातल्या २० जिल्ह्याच्या अधिसूचनांवर विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर पर्जन्यमान परिस्थिती लक्षात घेता, शासनाच्या "१ रुपयात पीक विमा" योजनेंतर्गत असलेली अट शिथिल करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२३ मध्ये हंगामातील प्रतिकुल परिस्थिती (Mid-Season Adversity) या बाबी अंतर्गत २४ जिल्ह्यात अधिसूचना निर्गमित झाल्या असून एकूण १२९७ महसूल मंडळ पात्र झाले आहेत. सदर बाबी अंतर्गत दिनांक २४/११/२०२३ अखेर एकूण पात्र शेतकरी संख्या ४५.७७ लाख एवढी असून निश्चित नुकसान भरपाईची रक्कम रुपये २०२६.१७ कोटी आहे. त्यापैकी २३.०२ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १०३६.८० कोटी वाटप करण्यात आली असून उर्वरित नुकसान भरपाई रक्कम पात्र शेतकऱ्यांना वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

विमा कंपन्यांकडून एकूण १६ जिल्ह्यांच्या अधिसूचनेवर विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल करण्यात आले आहे.

(४) योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे अधीन राहून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत

**(३) * २१९५९ ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँकेची स्थापना कर्मचाऱ्याच्या हितासाठी केलेली असताना बँकेच्या संचालक मंडळाने घेतलेल्या मनमानी व चुकीच्या निर्णयामुळे सभासदांनी १८० कोटी रुपयांच्या ठेवी काढून घेतल्यामुळे सदर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात यावे अशी मागणी बँकेच्या सभासदांनी विभागाकडे दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेचा क्रेडिट डिपॉझिट रेशो (सी.डी.रेशो) कर्जाच्या व ठेवींच्या प्रमाणात ७० टक्के असावा लागतो, तथापि, स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँकेतून मोठ्या प्रमाणात ठेवी काढल्याने बँकेचा क्रेडिट डिपॉझिट रेशो ८५ टक्केपेक्षा जास्त झाला असल्याने बँकेची आर्थिकदृष्ट्या डबघाईला आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) नाही.

बँकेच्या संचालक मंडळाच्या मनमानी कारभारामुळे बँकेचे नुकसान होत असल्याने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत सभासदांचा दिनांक ०४/०९/२०२३ रोजीचा तक्रार अर्ज सहकार आयुक्त कार्यालयास अथवा शासनास अद्याप प्राप्त नाही.

(२) व (३) बँकेच्या ठेवीदारांनी सुमारे रुपये १८० कोटीच्या ठेवी काढल्यामुळे बँकेचा क्रेडीट डिपॉझिट रेशो CDL रेशो वाढला होता.सदर सी डी रेशो कमी करण्यासाठी बँकेने कर्ज वितरण मर्यादित प्रमाणात सुरु ठेवले आहे व ठेवी वाढविण्यासाठी विशेष ठेव योजना कार्यान्वित केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने दिनांक १०/०७/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.७ "पगारदार असल्याने कर्मचारी जामीनदाराची गरज नाही" व ठराव क्र.९ "कर्जाचे व्याजदर ९% व १४% वरून ७% इतके कमी" करण्याचा ठराव केला आहे.

मात्र सदर ठरावामुळे बँकेचे आर्थिक नुकसान होणार असल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ०५/०९/२०२३ च्या पत्रान्वये योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश बँकेस दिले आहेत. त्यानुसार बँकेने सदर ठराव मागे घेतल्याचे दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेस कळविले आहे.

संचालक मंडळाच्या चुकीच्या निर्णयामुळे बँकेच्या व्यवसायावर अनिष्ट परिणाम होत असल्याने बँकेचे कामकाज सहकार कायदा व बँकीग नियमन अधिनियम मधील तरतूदीनुसार होत आहे किंवा नाही याबाबतचा आढावा घेण्याचे निर्देश सहकार आयुक्तांनी दिनांक २५/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांना दिले आहेत. त्यानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचे स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील सातपाटी येथील जगप्रसिध्द पापलेट माशाला विशिष्ट मानांकन देण्याबाबत

**(४) * २१८०३ श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा भारतीय अर्थव्यवस्थेत परकीय चलन देण्याबाबत अग्रेसर असून विशेषत: सातपाटी येथील पापलेट माशापासून मिळणाऱ्या परकीय चलनाचा यामध्ये सर्वात मोठा वाटा असून गेल्या ३ वर्षात हवामान बदलामुळे व समुद्रातील विविध हालचालींमुळे माशाची मिळकत कमी झाल्याने पापलेट

मत्स्यव्यवसायावर मोठा विपरित परिणाम झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मच्छिमारांना पारंपारिक पध्दतीने मासेमारी करताना विविध साधने मस्त्यव्यवसाय विभागाने उपलब्ध करून देणे आवश्यक असून याच बरोबरीने पापलेटसाठी विशिष्ट मानांकन देऊन त्याचे जगभर ब्रांडीग करण्याची मागणी येथील मच्छिमारांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पापलेट मत्स्यव्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी व हा व्यवसाय वाढविण्यासाठी तसेच पापलेट माशासाठी विशिष्ट मानांकन देऊन त्याचे जगभर ब्रांडीग करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. अंशत: खरे आहे.
(२) मच्छिमारांना पारंपारिक पध्दतीने मासेमारी करताना आवश्यक असलेल्या मासेमारी साधनांच्या खरेदीसाठी अनुदान देण्याची योजना शासनाकडून राबविण्यात येत असून सदर योजना राबविण्यासाठी मासेमारी साधनांवर अर्थसहाय्य देणेसाठी शासन निर्णय दिनांक ०९/०२/२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. पापलेट माशाला विशिष्ट मानांकन देऊन त्याचे जगभर ब्रांडीग करण्याची मागणी दिसून येत नाही.
(३) महाराष्ट्र शासनाने पापलेट मासा वैशिष्टपूर्ण निवडक प्रजातीचा असल्याने शाश्वतता, संवर्धन आणि वाढीसाठी “राज्य मासा” म्हणून घोषित केला आहे. जेणेकरून या माध्यमातून पापलेटचे जतन व संवर्धन, सागरी पर्यावरण, जीवसाखळी आणि मच्छीमारांची आर्थिक उपजिविका टिकवून ठेवता येईल. तसेच पापलेट जातीच्या लहान मासांचे (Juvenile Fishing) मासेमारीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ अन्वये महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ अंतर्गत पापलेट माशाला वाणिज्यिक दृष्टया महत्वाच्या प्रजातीमध्ये समावेश करून १३५ टी.एल. (Total length) इतके परिपक्वतेचे किमान आकारमान निश्चित करून त्यापेक्षा कमी आकाराचे पापलेट मासे पकडल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ व सुधारित कायदा २०२१ अन्वये नियंत्रण ठेवण्यासाठी शास्तीचे प्रयोजन ठेवले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात कमी पावसामुळे भातशेती करपल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्याबाबत

**(५) * २१७६० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात यावर्षी अपेक्षित पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील ९ हजार ८६४ हेक्टर भात शेती करपली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून एकूण २४ हजार ७७ शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण तालुक्यात भात शेतीचे सर्वाधिक नुकसान झाले असून या भागातील ५ हजार ९४२.४० हेक्टरवरील भात शेती करपली असल्याचे अहवालात उघडकीस आले असून रायगडातील नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे कृषी विभागाने केले असून शासनाकडे ८ कोटी ४६ लाख रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील भात शेतीच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मदत जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

माहे जुलै, २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती/फळ पिकाखालील एकूण ९८५८ हे. क्षेत्र बाधित झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

अतिवृष्टीमुळे पेण तालुक्यात शेती/फळ पिकाखालील एकूण ५ हजार ९४२.४० हे. क्षेत्र बाधित झालेले आहे.

(३) महसूल व वन (मदत व पूनर्वसन) विभागाने दिनांक ३०/११/२०२३ च्या शासन निर्णयान्वये रायगड जिल्ह्याकरीता एकूण ९८५७.३६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी निविष्ठा अनुदान म्हणून एकूण रुपये ८४७.१४ लक्ष इतका निधीस मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील साखरमाची गावातील विस्थापितांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(६) * २१७१९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण (जि.पुणे) गाव डोंगराच्या दरडी खाली गाडले गेल्यानंतर शेजारी साखरमाची गावातील नागरिकांना मुरबाड (जि.ठाणे) येथे घरांऐवजी पोल्ट्री फार्म भाड्याने घेऊन ठेवण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील २२ कुटुंबांना अत्यंत वेदनादायक जीवन जगावे लागत असल्याने गावकऱ्यांसह अनेक संघटनांनी आंदोलन करूनही प्रशासनाने कोणतीच दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गावातील विस्थापितांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे नाही.

मौजे साखरमाची येथील २२ प्रकल्पग्रस्त कुटुंबांना बांधकामासाठी वन विभागाकडून रुपये ४३,९४,४८८/- अनुदान वाटप झाल्यावर सदर प्रकल्पग्रस्तांनी स्वत:हून श्री.शंकर नारायण देसले, रा.साजई, ता.मुरबाड, जि.ठाणे यांचे मालकी सर्वे नं. ३८ क्षेत्रामध्ये तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारून राहण्याची व्यवस्था केलेली आहे. विस्थापित कुटुंबांकरीता पाण्याची, विजेची व शौचालयाची सोय करण्यात आलेली आहे. वन विभागाच्या जागेवर वन संवर्धन अधिनियम अंतर्गत प्रस्ताव सादर करून या पुनर्वसनाची अंतिमतः मंजूरी येईपर्यंत त्यांना तात्पुरत्या स्वरूपात निवारा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) साखरमाची येथील पुनर्वसीत ग्रामस्थांनी पुनर्वसनाकरीता मौजे लांबाचीवाडी (मुरबाड) येथील राखीव व संरक्षित वन निवडले आहे. सदर क्षेत्राचा वनेत्तर वापर करण्याकरीता वन संवर्धन अधिनियम, १९८० मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाची पूर्वपरवानगी प्राप्त करण्याबाबत मौजे लांबाचीवाडी (मुरबाड), ता.मुरबाड, जि.ठाणे येथील राखीव वन सर्वे क्र. ३०६/गट नं. १५० व संरक्षित वन सर्वे क्र. २८६/गट नं. १३९ मधील एकूण ६५ हेक्टर जमीन वनेत्तर वापरासाठी वळतीकरणासाठी केंद्र शासनाची पूर्व परवानगी मिळण्यासाठी वन संवर्धन अधिनियम, १९८० कलम २ अंतर्गत वन विभाग, ठाणे यांनी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-भाईंदर खाडीवरील प्रस्तावित पुलाच्या बांधकामाकरीता मिठागरांच्या व कांदळवनांच्या जागांबाबत

**(७) * २१६६१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-भाईदर खाडीवरील प्रस्तावित पुलासाठी मिठागरांच्या व कांदळवनाच्या जागेचा अडथळा निर्माण झाला असल्याची बाब दिनांक २४ सप्टेंबर,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेबाबत तोडगा काढून सदर प्रकरण निकालात काढण्याबाबत शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वसई-भाईंदर खाडीवरील पुलाच्या बांधकामाकरीता ३.४३१ हे. क्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने लागणाऱ्या पर्यायी वनीकरणासाठी धाराशिव जिल्ह्यातील प्रस्तावित केलेल्या ३.४४ हे. जमिनीपैकी फक्त २.०० हे. जमीन पर्यायी

वनीकरणासाठी उपयुक्त असून व उर्वरीत १.३४ हे. जमीन सुयोग्य नसल्याने तेवढेच पर्यायी क्षेत्र उपलब्ध करुन देण्याबाबत प्रकल्प यंत्रणेस कळविण्यात आले आहे. अद्यापही प्रकल्प यंत्रणेने याबाबतची पूर्तता केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तसेच नागपूर शहरातील आपत्तीग्रस्त नागरिकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(८) * २१५०२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: पश्चिम विदर्भ, खानदेश, बुलढाणा, जळगाव, नाशिकसह मराठवाड्यातील अनेक भागात दिनांक २८ व २९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या अतिवृष्टी व ढगफूटीसदृश पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे तसेच नागपूर शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे नागनदीला पूर आल्याने १० हजारपेक्षा जास्त घरांचे व मालमत्तेचे नुकसान होऊन ५ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन अध्यादेशानुसार अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाईचे क्षेत्र वाढविण्यात आले असले तरी हेक्टरी मदतीचे क्षेत्र मात्र घटविण्यात आले असल्याने शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीची रक्कम नाममात्र आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना व नागपूर शहरातील आपत्तीग्रस्त नागरिकांना आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही वा धोरणात्मक निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागात दिनांक २८ व २९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीसदृश पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेले नाही. मात्र नाशिक विभागात शेतीपिकांचे नुकसान झालेले आहे.
नागपूर शहरात सप्टेंबर, २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे घरांचे व पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आहे. तसेच ४ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नाशिक विभागातील ६००५.१५ लक्ष हेक्टर शेतीपिकांच्या नुकसानीकरीता रुपये ९६०.२३ लक्ष इतक्या निधी मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून लवकरच निधी वितरणास मान्यता देण्यात येईल.

नागपूर शहरातील घरांच्या नुकसानीसाठी रुपये ८५.४४ लक्ष इतका निधी वितरित करण्यास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ३०/११/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच, नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू पावलेल्या नागपूर शहरातील ४ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये ४ लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषतः वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, यवतमाळ जिल्ह्यातील तसेच पुसद तालुक्यातील सोयाबीन उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(९) * २१५८१ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.निलय नाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, यवतमाळ जिल्ह्यात तसेच पुसद तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सोयाबीन पिकावर पिवळ्या मोझॅकचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेत शिवार पिवळे पडत असून सोयाबीन शेंगा गळणे, सोयाबीनचा दाणा भरला जात नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊन शेतकऱ्यांनी केलेला लागवड खर्चही निघणे शक्य नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामातील सर्वाधिक घेतल्या जाणाऱ्या सोयाबीन पिकांची यावर्षी २ लाख ३३ हजार ८४५ हेक्टरवर शेतकऱ्यांनी पेरणी केली असून त्यातील ३२ हजार हेक्टरवर रोगांची लागण झाल्याचा प्राथमिक अहवाल कृषी विभागाला प्राप्त झाला असून नुकसानग्रस्त क्षेत्रांमध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे पीक विम्याची मदत वेळेत शक्य व्हावी आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २०२३ रोजी संयुक्त पंचनामे करण्याचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व पीक विम्याची रक्कम देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात प्रत्यक्ष ५०.८६ लाख हे. क्षेत्रावर खरीप हंगाम २०२३ मध्ये सोयाबीन पीक घेण्यात आले असून राज्यात सोयाबीन पिकावर ७.०९८ लाख हे क्षेत्रावर पिवळ्या मोझॅक/ खोडकुज/मुळकुज याचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी वर्धा-०.८६ लाख हे., चंद्रपूर-०.५८ लाख हे., गडचिरोली-०.००२ लाख हे., हिंगोली-१.५४ लाख हे., यवतमाळ-०.९८ लाख हे.क्षेत्रावर प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

मदत व पुनर्वसन विभागाचे पत्र क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.२२२/म-३, दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ च्या पत्रान्वये कोकण विभाग आणि नाशिक, धुळे, पुणे, सातारा, सांगली, भंडारा व गोंदिया हे जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच्या पिकावर पिवळया मोझॅक हा विषाणूजन्य रोग आणि खोडकुज व मुळकूज या बुरशीजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे बाधित झालेल्या क्षेत्राचे पंचनामे करण्याबाबत सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) सोयाबीन पिकावरील रोगाच्या अनुषंगाने बाधित क्षेत्राबाबत संयुक्त स्वाक्षरी अहवाल महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागास सादर करण्यात आला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही मदत व पुनर्वसन विभागामार्फत सुरु आहे.

हिंगोली व चंद्रपूर जिल्ह्यात पात्र विमा क्षेत्र घटकांतर्गत हंगामातील प्रतिकूल परिस्थिती (MSA) अधिसूचना निर्गमित केलेली आहे. स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ या जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत प्राप्त पीक नुकसान सूचनांचे सर्वेक्षण संयुक्त समितीमार्फत करण्यात आलेले आहे.

पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पीक विमा नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) * २२२११ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात प्रथम श्रेणीचे ९ व द्वितीय श्रेणीचे ९ पशुवैद्यकीय दवाखाने असून यातील ७ पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या ५३ मंजूर पदांपैकी १७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखान्यात पशुधनांवरील मोठ्या शस्त्रक्रियेसाठी वैद्यकीय सामुग्रीच्या अनुपलब्धतेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पशुधनावर खाजगी पशुवैद्यकांकडून उपचार करुन घ्यावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असून, अपुऱ्या मनुष्यबळाअभावी पशुवैद्यकीय विभागाच्या अनेक योजना पशुपालकांपर्यंत पोहचत नसल्याने येथील पशुपालकांना योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही. पशुपालकांना सेवा पुरविण्यासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून रिक्त पदांचे कामकाज, अतिरिक्त कार्यभार तसेच बाह्यस्त्रोतांद्वारे मनुष्यबळ

उपलब्ध करून घेण्यात आले आहे. पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील २९३ उमेदवारांची शासनास शिफारस प्राप्त झाली असून, सदर अधिकाऱ्यांना विहित प्रक्रियेने रुजु करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये करण्यात येणाऱ्या पदभरती मोहीमेअंतर्गत पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या अधिनस्त गट-क संवर्गाची ४४६ पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याद्वारे उपलब्ध उमेदवार, रिक्त पदांची संख्या व आवश्यकता विचारात घेवून रिक्त पदे भरण्यात येतील.

-----------------

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहारामध्ये दोषी आढळलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(११) * २१३६९ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये इमारत बांधकाम, मुख्य कार्यालय व इस्लामपूर शाखेसह अन्य शाखांमधील फर्निचर, एटीएम मशीन व नोटा मोजणी मशीन, नियमबाह्य पध्दतीने दिलेल्या जाहिराती इ.करीता कंत्राटदाराच्या हितासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात येऊन आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात येऊन त्याअनुषंगाने चौकशी समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीकडून बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली असूनही, चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधितांवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहारामध्ये दोषी आढळलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी सहकार आयुक्त, पुणे यांच्या दिनांक १७/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री.छत्रीकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), कोल्हापूर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार सदर समितीने चौकशी पूर्ण करुन सहकार आयुक्त, पुणे यांना दिनांक १५/०६/२०२३ रोजी अहवाल सादर केला आहे.

सदर चौकशी अहवालातील नमूद मुद्द्यांच्या अनुषंगाने वैधानिक चौकशी करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये श्री.मंगेश सुरवसे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,सांगली यांची दिनांक ०३/११/२०२३ रोजी प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तथापि, श्री.सुरवसे हे सदर बॅंकेच्या संचालक मंडळात विशेष निमंत्रीत सदस्य असल्याने त्यांच्याजागी दिनांक १६/११/२०२३ रोजीच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,

कोल्हापूर यांच्या आदेशानुसार श्री.संदीप जाधव, उपनिबंधक सहकारी संस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार चौकशीचे पुढील कामकाज सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील ओगदा ग्रामपंचायतीमधील आदिवासी पाडे मुख्य रस्त्याला जोडण्याबाबत

**(१२) * २२१५७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील अतिदुर्गम भागातील ओगदा ग्रामपंचायतीमधील मोहमाळ, ताडमाळ व तीळमाळ हे आदिवासी लोकवस्ती असलेले पाडे अद्याप मुख्य रस्त्याला जोडलेले नसल्याने तसेच सुकसाळे (ता.विक्रमगड) येथील मुख्य रस्त्याला जोडलेला रस्ता मागील वीस वर्षांपासून दुरूस्त झाला नसल्याने आदिवासी बांधवांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून पावसाळ्यात शालेय विद्यार्थी, आजारी रुग्ण, गरोदर माता, वृध्द यांना पक्क्या रस्त्याअभावी चिखलातून प्रचंड त्रास सहन करीत मुख्य रस्त्यापर्यंत प्रवास करावा लागत असल्याची गंभीर बाब दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि वाडा तालुक्यातील ओगदा ग्रामपंचायतीमधील मोहमाळ, ताडमाळ व तीळमाळ हे आदिवासी पाडे मुख्य रस्त्याला पक्क्या रस्त्यांनी जोडण्याबाबत तसेच सुकसाळे, ता.विक्रमगड येथील मुख्य रस्त्याला जोडलेला रस्ता मागील वीस वर्षापासून दुरूस्ती झाला नसून हे आदिवासी पाडे मुख्य रस्त्याला पक्क्या रस्त्यांनी जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मोहमाळ, ताडमाळ, तीळमाळ (ता.वाडा) हे पाडे वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात येत असल्याने तेथे कोणत्याही योजनेतून काम करण्यास प्रतिबंधित क्षेत्र आहे.

तसेच, सुकसाळे, ता.विक्रमगड या रस्त्यावर वाहतूक सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वेरुळ (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे पशु चिकित्सालय मंजूर करणेबाबत

**(१३) * २१२४५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेरुळ (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) या परिसरात शेतकऱ्यांकडे गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी इत्यादी जवळपास १५००० पशुधन असून परिसरात पशु चिकित्सालय नसल्यामुळे उपचाराअभावी पशु दगावून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेरुळ येथे पशु चिकित्सालयाला मान्यता मिळावी म्हणून ग्रामस्थ मागील ५ वर्षांपासून पाठपुरावा करत असूनही अद्याप पशु चिकित्सालयास मान्यता मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेरुळ परिसरातील शेतकरी व पशु मालक यांच्या मागणीनुसार मौजे वेरुळ येथे पशु चिकित्सालय मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) २० व्या पशुगणनेनुसार वेरुळ परिसरात एकूण पशुधन संख्या गाय वर्ग-७३१, म्हैस वर्ग-१०२ व शेळी मेंढी-२५१ असे एकूण १०८४ पशुधन आहे. या परिसरात खुलताबाद येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ कार्यरत असून सदर दवाखान्यामार्फत परिसरातील पशुंना सर्व प्रकारच्या पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(२), (३) व (४) दिनांक ०१/०७/२०११ च्या शासन निर्णयातील नमूद निकषानुसार, २ पशुवैद्यकीय संस्थांमध्ये किमान ५ कि.मी. अंतर असणे आवश्यक आहे. वेरुळ पासून ४ कि.मी. अंतरावर पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ खुलताबाद ही पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून त्या अंतर्गत ११ गावांचा समावेश आहे. वेरुळ या ठिकाणी नवीन पशुवैद्यकीय दवाखाना अनुज्ञेय ठरत नाही.

-----------------

## मदर डेअरीच्या सहाय्याने दूध उत्पादन वाढीसाठीच्या विशेष प्रकल्पात बीड, हिंगोली, परभणी व छत्रपती संभाजीनगर या चार जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबत

**(१४) * २१७५७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्या एकत्रित प्रयत्नातून मदर डेअरीच्या सहाय्याने मराठवाडा व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये दूध उत्पादन वाढीसाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येत असल्यामुळे दूध उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत मराठवाड्यातील ४ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला असून बीड, हिंगोली, परभणी व छत्रपती संभाजीनगर या उर्वरीत ४ जिल्ह्यांचा समावेश या प्रकल्पामध्ये केल्यास या जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त नमूद ४ जिल्ह्यांचा समावेश या प्रकल्पात करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाकडून या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) तसेच सदरहू प्रकल्पामध्ये उपरोक्त नमूद ४ जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, शासन या प्रकरणी सकारात्मक असल्यास, याबाबतची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करणार आहे ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ११ जिल्ह्यातील ३४६३ गावांचा समावेश होता.पहिल्या टप्प्याच्या अंमलबजावणी दरम्यान आलेला अनुभव विचारात घेऊन विदर्भ व मराठवाडा विभागातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करुन “दुग्ध उद्योजकता” प्रकल्प अहवाल तयार करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील तीन हजार विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांच्या गटसचिवांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * २१४७८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार क्षेत्राचा ग्रामीण भागातील पाया असलेल्या विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांचा गटसचिव हा महत्वाचा पदाधिकारी असून हिशोब व पत्रव्यवहार गट सचिवामार्फत पार पाडले जात असताना राज्यातील तीन हजार विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांच्या दोन हजार गटसचिवांना गत पाच वर्षांपासून वेतन अदा केले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या महत्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या गटसचिवांचे वेतन प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाकडून राज्यातील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांच्या दोन हजार गटसचिवांचे पाच वर्षांपासून प्रलंबित असलेले वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३१/०३/२०२३ अखेर राज्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांवर संवर्गीकरण योजनेनुसार ४७५८ गटसचिव कार्यरत आहेत. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांवर संस्था नियुक्त गटसचिवांची संख्या ३३३८ असून कार्यरत गटसचिवांचे वेतन व भत्ते यांची थकबाकी रुपये ८३.०८ कोटी आहे. तसेच सेवानिवृत्त गटसचिवांच्या वेतन व भत्ते यांची थकबाकी रुपये १५.९६ कोटी आहे.

(२) वैद्यनाथन समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने त्रिस्तरीय पतसंरचना यंत्रणा सक्षम, बळकट व स्वायत्त करणेसाठी राज्य शासन, नाबार्ड व केंद्र शासन यांच्यामध्ये दिनांक १३/११/२००६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार गटसचिव हे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे सेवक असून त्यांचा पगार संबंधित संस्थेने अदा करणे आवश्यक आहे.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या आर्थिक संस्था असून कर्ज व्यवहार व सेवांच्या माध्यमातून संस्थांनी सक्षम होणे आवश्यक आहे. यामध्ये संबंधित संस्थेच्या सचिवांची महत्वाची भूमिका आहे. संस्थांकडून कर्जवाटपाच्या अनुषंगाने कर्जाची वसूली होत नसल्याने गटसचिवांचे वेतन अदा करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

(३) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना त्यांचा व्यवस्थापन व आस्थापना खर्च भागविण्यासाठी येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन या संस्थांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत पीक कर्ज पुरवठ्याचे प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ०६/०९/२०१४ निर्गमित करण्यात आला असून सदर शासन निर्णयातील निकषात सुधारणा करून शासन निर्णय दिनांक १६/११/२०२१ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांना संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्यामार्फत जास्तीत जास्त रुपये १.५० लाख प्रती संस्था निधी वितरीत करण्यात येतो. सदर योजनेंतर्गत आज अखेर रक्कम रुपये ११५.७२ कोटी अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

यासंदर्भात सहकार आयुक्त कार्यालय, पुणे येथे दिनांक ०१/०९/२०२३ रोजी व मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ११/१०/२०२३, दिनांक ०८/११/२०२३ रोजी महाराष्ट्र राज्य गटसचिव संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली असून त्यांच्या सेवा व वेतनासंबंधित प्रश्न सोडविणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(१६) * २२१९३ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी २४ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, सदर जिल्ह्यांमधील ८९० महसूल मंडळातील खरीप पिकांचे उत्पादन ५० टक्के पेक्षा कमी होण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला असल्याने अन्नधान्याची तूट निर्माण होण्याची शक्यता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील पीक परिस्थितीचा आढावा घेऊन दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेल्या जिल्ह्यांमध्ये अन्नधान्याचा पुरवठा होण्याच्यादृष्टीने तसेच अन्य सवलती जाहीर करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात दिनांक १ जून ते ३१ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये ९२८.८ मि.मी. पाऊस झाला असून तो सरासरी पाऊस १०७५.३ मि.मी. च्या तुलनेत ८६ टक्के आहे. राज्यातील १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यात दुष्काळ घोषित करण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ च्या खरीप हंगामातील प्रथम पूर्वानुमान अहवालानुसार ६२.६७ लाख टन अन्नधान्य उत्पादन अपेक्षित असून ते सरासरी अन्नधान्य उत्पादनाच्या (७९.८९ लाख टन) तुलनेत २२ टक्केने कमी आहे.

(२) राज्यातील १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यात दुष्काळ घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने २४.७६ लाख हे. शेती/फळपिकाखालील बाधित क्षेत्राकरीता रक्कम रुपये २५८७.७१ कोटी इतक्या निधी मागणीचे ज्ञापन केंद्र शासनास सादर करण्यात आलेले आहे. तसेच ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील १०२१ महसूल मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील ११० आदिवासी पाड्यातील लोकांना जाण्या-येण्यासाठी रस्ते नसल्याबाबत

**(१७) * २११८४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ११० आदिवासी पाड्यांमध्ये आजही गरोदर महिला, माता, बालके, वयोवृध्द इत्यादींना उपचारासाठी रुग्णालयात जाण्या-येण्यासाठी रुग्णवाहिकेला रस्ता नसल्यामुळे उपचाराअभावी रुग्णांना आपला जीव गमवावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर गावांचे सर्वेक्षण करुन ती गावे मूळ रस्त्याला जोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील मुख्य रस्त्याशी न जोडलेले वाडे/पाडे आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी शासन निर्णय दिनांक १३/०९/२०२३ अन्वये "भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना" सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * २१५०८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड, सिल्लोड व पैठण येथील दुय्यम निबंधकांनी चुकीच्या पध्दतीने दस्त नोंदणी केल्याने नागरिकांनी नोंदणी उप महानिरीक्षक यांच्याकडे तक्रारी केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नोंदणी उप महानिरीक्षक यांचे संबंधित दुय्यम निबंधकांशी आर्थिक संगनमत असल्याने नागरिकांनी तक्रारी केल्याच्या अनुषंगाने दुय्यम निबंधकांवर कारवाई करण्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने चुकीच्या पध्दतीने दस्त नोंदणी करणाऱ्या दुय्यम निबंधकांवर कारवाई करुन सदरहू कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या नोंदणी उप महानिरीक्षक यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर दरम्यान दुय्यम निबंधक श्रेणी-१, पैठण व कन्नड या कार्यालयाच्या तक्रारी नोंदणी उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

तथापि, श्री.देविदास लोंखडे यांनी मा.मंत्री (महसूल), महोदयांना लिहिलेल्या दिनांक १२/०१/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जान्वये श्री.सी.यु.पाटील, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, सिल्लोड यांनी सिल्लोड तालूक्यात तुकडाबंदी कायद्याचे सरासपणे उल्लंघन करून सर्वसामान्य नागरीकांची आर्थिक लूट करत असल्याची तक्रार करून त्यांना तात्काळ निलंबन करून त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी अशा स्वरूपाची तक्रार करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

उक्त तक्रारीच्या अनुषंगाने नोंदणी उपमहानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर, यांनी जा.क्र/नोउमणीऔ१७५९/२०२३ दिनांक ०३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तपासणी पथक गठीत करुन सर्वंकष तपासणी करणेबाबत तपासणी पथकास आदेशित करण्यात आले आहे.

त्यामुळे नागरिकांनी तक्रारी केल्याच्या अनुषंगाने दुय्यम निबंधकांवर कारवाई करण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

(३) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १७/१०/२०२३ अन्वये प्रस्तूत प्रकरणी तात्काळ चौकशी करून चौकशी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास पाठविण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणात नोंदणी उपमहानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर, यांनी जा.क्र/नोउमणीऔ१७५९/२०२३ दिनांक ०३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तपासणी पथक गठीत करुन सर्वंकष तपासणी करणेबाबत तपासणी पथकास आदेशित करण्यात आले आहे.

तपासणी पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यात काही अनियमितता आढळल्यास दोषींविरुध्द नोंदणी अधिनियमातील तरतूदीनुसार संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २५० आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याबाबत

**(१९) * २१३२३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरीता ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून आश्रमशाळेचा विकासात्मक कायापालट करुन त्यामध्ये आयसीटी लॅब, सायन्स लॅब, संगीत व कला विभाग, सुलभ शौचालय अशा सुसज्ज भौतिक सोयीसुविधा निर्माण करुन त्यामाध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक विकास करण्याच्यादृष्टीने २५० आश्रमशाळा या आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी बहुल जिल्ह्यामधील अथवा पेसा कायदा लागू असलेल्या जिल्ह्यामधील शासकीय आश्रमशाळांचा प्राधान्याने समावेश करण्यात येणार असून शैक्षणिक शुल्कामध्ये डिजीटल क्लासरुम, व्हर्चुअल क्लासरुम, आणि कॉम्प्युटर लॅब याचा समावेश करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासनाकडून आदर्श आश्रमशाळा विकसित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच २५० आश्रमशाळांचा विकास किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासनाने घोषित केलेल्या २५० आदर्श आश्रमशाळांपैकी प्रथम टप्प्यात १२१ आदर्श आश्रमशाळा विकसित करण्यात येत असून त्यामध्ये डिजिटल क्लासरुम, व्हर्चुअल क्लासरुम, टॅब लॅब, फेसियल बायोमॅट्रिक इत्यादी अत्याधुनिक डिजीटल शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यास्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना “सेंट्रल किचन” योजनेद्वारे निकृष्ट दर्जाच्या अन्नाचा पुरवठा होत असल्याबाबत

**(२०) * २१६३१ श्री.आमश्या पाडवी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार, पालघरसह राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर ताजा व सकस आहार पुरविला जात असताना “सेंट्रल किचन” योजनेंतर्गत एकाच ठिकाणी अन्न शिजवून संपूर्ण जिल्ह्यात पुरविले जाणारे जेवण हे शिळे व निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतच्या तक्रारी आश्रमशाळेतील विद्यार्थी व पालकांकडून करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक, अपर आयुक्त, आदिवासी विभाग नाशिक व ठाणे तसेच प्रकल्प कार्यालय यांच्याकडे लेखी निवेदनद्वारे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील आश्रमशाळेत सेंट्रल किचनद्वारे पुरवठा होणाऱ्या भोजनाची तपासणी करण्याच्या अनुषंगाने मा.विधान परिषद सदस्य यांनी दिनांक २२/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक कार्यालयास निवेदन दिलेले आहे.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना उत्तम प्रतीचे जेवण मिळण्याच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यातील आश्रमशाळेत सेंट्रल किचनच्या माध्यमातुन पुरवठा होणाऱ्या भोजनाची तसेच त्यात वापरल्या जाणाऱ्या साधनसामग्रीची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक २८/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प अधिकारी, नंदुरबार यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळपीक विम्याचा परतावा मिळण्याबाबत

**(२१) * २१९९७ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी विमा परतव्याच्या प्रतीक्षेत असून हजारो शेतकऱ्यांचे दावे विमा कंपनीकडून मंजूर करूनही शासनाने त्यांच्या विमा हप्त्याचा हिस्सा न भरल्याने संत्रा उत्पादकांना फळपीक विम्याच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळपीक विम्याचा परतावा मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

आंबिया बहार सन २०२२-२३ मधील राज्य हिस्सा अनुदान रू ९४,८५,२८,५४९/- रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीस रक्कम अदा करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक ०३/११/२०२३ रोजी केंद्र हिस्सा अनुदान रक्कम विमा कंपन्यांना प्राप्त झालेला आहे.

यानुषंगाने अमरावती जिल्ह्यांतील नुकसान भरपाईस पात्र शेतकऱ्याना नुकसान भरपाई अदायगीची कार्यावाही विमा कंपनी स्तरावरून सुरू आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गोसीखुर्द प्रकल्पातील प्रकल्पबाधितांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(२२) * २१५४६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द या राष्ट्रीय प्रकल्पाकरीता भंडारा जिल्ह्यातील ३४ पूर्णतः तर अंशतः १०४ गावे, नागपूर जिल्ह्यातील ८५ गावे बाधित झाली असून भंडारा जिल्ह्यातील १२ हजार ४७५ हेक्टरपैकी १२ हजार ३६१ हेक्टर तसेच नागपूर जिल्ह्यातील ३३.३६ हेक्टरपैकी २७.६६ हेक्टर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील २६८२ हेक्टर जमिनीपैकी २ हजार ६३२ हेक्टर शेतजमीन संपादित झाली असून या गावातील १४ हजार पेक्षा अधिक कुटुंब विस्थापित होवून प्रकल्पबाधित झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणामुळे कुही तालुक्यातील ३३ गावे पूर्णतः बाधित झाली असून या प्रकल्पबाधित गावातील अनेकांची नावे मतदार यादीत नसणे, रेशनकार्ड, घरफळा पावती, खरेदी पत्र, वीज देयके ही आवश्यक कागदपत्रे नसल्याने या प्रकल्पग्रस्तांना आजही भूखंड मिळालेला नाही तसेच कुही तालुक्यातील नवेगांव येथील १३ कुटुंब, चिचगड येथील ८ कुटुंब, हरदोरी नाईक येथील २६ कुटुंब भुखंडापासून वंचित असून या प्रकल्पबाधित कुटूंबांना राज्य शासनाचे धोरण निश्चत करून १००० चौ.फु.चे भुखंड तथा पुनर्वसन गावठाणात आवश्यक नागरी सुविधांचा अभाव, सांडपाणी व निसर्गाचे पाणी यांचे विल्हेवाट लावण्याबाबत तसेच इतरही अनेक समस्यांना सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पबाधितांच्या उक्त समस्यांचा निपटारा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द प्रकल्पामुळे नागपूर जिल्ह्यातील ५१ पूर्णत: व अंशत: बाधित २८ गावे एकूण ८५ गावे बाधित होत आहेत तर भंडारा जिल्ह्यातील ३४ पूर्णत: व अंशत: बाधित ७० गावे एकूण १०४ गावे बाधित होत आहेत.

नागपूर जिल्ह्यातील एकूण १३०४४.५६ हे.आर. क्षेत्रापैकी १२८५१.३६ हे.आर. जमिनीचे भुसंपादन करण्यात आलेले असून, उर्वरीत १९३.२० हे.आर. जमिनीचे भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. भंडारा जिल्ह्यातील एकूण ९००८.२१ हे.आर. क्षेत्रापैकी ८७९४.५१ हे.आर जमिनीचे भुसंपादन करण्यात आले असून उर्वरित २१३.७० हे.आर जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील २७८५ हे. जमिनीपैकी २६८९ हे. जमीन संपादीत करण्यात आली असून ७६ हे. जमीन संपादनाच्या प्रक्रियेत आहे.

नागपूर जिल्ह्यातील (८३४८ कुटुंबे) व भंडारा जिल्ह्यातील (६६६३ कुटुंबे) अशी एकूण १४९८४ कुटुंबे बाधित होत आहे. असोलामेंढा धरणाची उंची वाढल्यामुळे चंद्रपुर जिल्ह्यातील १७८ कुटुंबे बाधित होत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

कुही तालुक्यातील मौजा-चिचघाट येथील पुनर्वसन मौजा-मौदा, ता.मौदा येथे झाले असून, एकूण १३० भुखंडापैकी ११५ भुखंड नियमानुसार वाटप करण्यात आले आहेत. तसेच हरदोली नाईक, या गावचे पुनर्वसन मौजा-बोरी (नाईक) क्र.२ येथे झाले असून २१८ भूखंड नियमानुसार वाटप करण्यात आले. तसेच नवेगांव या गावचे पुनर्वसन मौजा-बारी (नाईक) क्र ३ येथे झाले असून १११ भूखंड नियमानुसार वाटप करण्यात आले आहेत. वाढीव कुटुंबास १००० चौ. फुटाचे भूखंड वाटप करण्यातची तरतुद पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये नाही.

पर्यायी गावठाणात १८ नागरी सुविधाची कामे विनिदिष्टानुसार करण्यात आली आहेत. पाण्याची विल्हेवाट लावण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकल्पबधिताच्या समस्यांचा निपटारा करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नारा (ता.कारंजा घाडगे, जि.वर्धा) येथील “दादाराव केचे” अनुदानित आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(२३)** * **२१०९१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारा (ता.कारंजा घाडगे, जि.वर्धा) येथील दादाराव केचे अनुदानित आश्रमशाळेत शिकणाऱ्या मेळघाटातील एका विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी निदर्शनास आले असून सदर आश्रमशाळेत यापूर्वी देखील तीन विद्यार्थ्यांचे आकस्मिक मृत्यू झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी शाळा व्यवस्थापनाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय.

(२) व (३) होय.

शासन निर्णय दिनांक २८/१२/२०१६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या आपात्कालीन आढावा गट व सामाजिक वैद्यकीय आढावा गट यांनी पोलीस स्टेशन कारंजा, जि.वर्धा यांचेमार्फत आश्रमशाळेतील विद्यार्थी मृत्यूबाबत चौकशी केली. सदर मृत्यूबाबत त्यांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये विद्यार्थ्यांचा मृत्यू श्वास गुदमरुन झाल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची कारंजा पोलिसांमार्फत केलेल्या चौकशीमध्ये याच आश्रमशाळेमधील कु.प्रज्योत कवडे (इ. ९ वी) या विद्यार्थ्याने शिवम उईके याचा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिनांक ०३/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करुन सदर प्रकरणी पुढील तपास करीत आहेत.

तसेच कामात निष्काळजीपणा केल्याने दोषी आढळलेले अधीक्षक, मुख्याध्यापक व वर्गशिक्षक यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, वर्धा यांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार संस्थेने दिनांक ३१/०८/२०२३ रोजी अधीक्षक व वर्गशिक्षक यांना निलंबित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांना निधी अभावी जमीन आरोग्य पत्रिका न दिल्याबाबत

**(२४) * २१९२३ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत २०२३-२४ या आर्थिक वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३ हजार ३६० जमीन आरोग्य पत्रिका तयार करण्याचे उद्दिष्ट असताना कृषी विभागाने २ हजार ४५ शेतकऱ्यांच्या शेत जमिनीतील माती नमूने घेतले असल्याचे व त्यापैकी १ हजार ६६५ नमूने प्रयोगशाळेत पाठविले असता त्यातील अवघ्या २०० नमुन्याचीच तपासणी करण्यात आली असल्याचे दिनांक २९ जुलै, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीच्या आरोग्यपत्रिका तयार करण्यासाठी निधीची आवश्यकता असून निधी प्राप्त करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरु आहे असे जिल्हा कृषी अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचेकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला आहे काय असल्यास केव्हा व किती निधी उपलब्ध करुन दिला आहे हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रयोगशाळेची मंजूर तांत्रिक कर्मचारी संख्या ६ असून माहे जूलै, २०२३ अखेर प्रयोगशाळेत केवळ दोन कर्मचारी कार्यरत होते. उर्वरीत कर्मचारी पदे बदली, पदोन्नती आणि सेवा अधिग्रहीत केल्यामुळे अकार्यरत होती. सध्या प्रयोगशाळेत तीन नियमित कर्मचारी व करार पध्दतीवर दोन तांत्रिक विश्लेषक कार्यरत असून नमूना तपासणीची कार्यवाही वेगाने सुरु आहे.

(३) सन २०२३-२४ साठी राज्यातील सर्व जिल्ह्यांकरीता रुपये ३.८३ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्याला योजनेचा पहिला हप्ता रुपये ५,४७,८५०/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात पशुखाद्यामध्ये भेसळ करण्यात येत असल्याबाबत

**(२५) * २१२१९ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात दिवसेंदिवस पशुधनाच्या संख्येत वाढ होत असून सदर पशुधनाच्या सकस चारा व खाद्यासाठी हजारो रुपये खर्च करूनही भेसळयुक्त पशुखाद्य मिळत असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने उपायुक्त कार्यालय, पशुसंवर्धन विभाग, सातारा यांनी जिल्ह्यातील पशुखाद्य कंपन्यांची अचानक तपासणी करुन सुमारे १४ पशुखाद्यांचे नमूने पुणे येथील पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळेत अधिक तपासणी करण्यासाठी दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पाठविले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती पशुखाद्यांचे नमूने भेसळयुक्त आढळून आले आहेत व या कंपन्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर या संस्थेच्या तपासणी अहवालामध्ये सदर पशुखाद्य नमूने निकृष्ट प्रतीचे असल्याचे आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासक नेमताना निबंधकाकडून "ना-हरकत" प्रमाणपत्र घ्यावे लागत असल्याबाबत

**(२६) * २१६१४ श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९(अ) मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासक नेमताना सहकारी संस्थांना निबंधकांच्या "ना-हरकत" प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निबंधक कार्यालयातील संबंधित अधिकारी "ना-हरकत" प्रमाणपत्र देताना लाखो रुपयांची लाच घेतल्याखेरीज सदर प्रमाणपत्र संस्थांना देत नसल्याची तक्रार मुंबई ग्राहक पंचायतीच्यावतीने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे ऑगस्ट, २०२३ अखेर वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे प्रमाणपत्र देण्यासाठी सहकार निबंधकाच्या उपस्थितीची अट रद्द करण्यात यावी अशीही मागणी मुंबई ग्राहक पंचायतने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने मुंबई ग्राहक पंचायतीने केलेल्या तक्रारी व मागणीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) असे निवेदन प्राप्त झाले नाही. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या ईमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९ रोजी निर्गमित केला आहे. त्यामध्ये विकासकाची निवड करण्यासाठी घेण्यात येणारी विशेष सर्वसाधारण सभा सहकारी संस्थांच्या निबंधक कार्यालयाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत होण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याकरीता निबंधकाकडे सभासद यादीसह ७ दिवसात अर्ज सादर करावा. यावर निर्णय घेवून निबंधक प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करतील अशी तरतूद आहे. तथापि, ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कोणतीही सूचना विभागामार्फत निर्गमीत करण्यात आली नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात निधीअभावी आदिवासी बहुल गावांचा विकास प्रलंबित असल्याबाबत

**(२७) * २१४२८ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेचा निधी तसेच २२९ प्रस्ताव मागील दोन वर्षांपासून आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात प्रलंबित असल्याने आदिवासी बहुल गावांचा विकास होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन आणि निधीची तरतूद करुन सदर निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) खरे नाही.

(२) व (३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ अन्वये ठक्कर बाप्पा योजना सुधारित करण्यात आली असून सदर योजना सन २०२२-२३ पासून जिल्हास्तर व राज्यस्तरावरुन राबविण्याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सन २०२२-२३ मध्ये गटविकास अधिकारी, पं.स.कळमनुरी यांचेकडून कळमनुरी तालुक्यातील ७४ प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, कळमनुरी कार्यालयास प्राप्त झालेले होते. त्यापैकी परिपूर्ण ३६ प्रस्तावापैकी ४ कामांना जिल्हा स्तरावरून मंजुरी दिलेली आहे. तसेच ठक्कर बाप्पा वस्तीसुधार योजना ही नियमित योजना असून सदर योजनेंतर्गत कामांची मागणी उपलब्ध निधीपेक्षा मोठ्या प्रमाणात असल्याने दरवर्षी उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन आदिवासी वस्ती/ गावांतर्गतच्या विकास कामांना राज्यस्तर व जिल्हास्तरावरुन मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासींना स्टॅम्प पेपर उपलब्ध करून न देता त्याची काळ्याबाजारात विक्री होत असल्याबाबत

**(२८) * २१८७४ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील साडेचार लाख लोकसंख्या असलेल्या डहाणू तालुक्यातील दुर्गम भागातील खेडोपाड्यात ग्रामपंचायत, आरोग्य केंद्र, शाळा, रस्ते, वीज, पाणी, आदी सुविधा उपलब्ध आहेत, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास, शासकीय कार्यालयांशी निगडीत प्रतिज्ञापत्र, संमतीपत्र, एफिडेविट आदी शासकीय कामकाजांसाठी आवश्यक असलेल्या कोर्ट फी स्टॅम्प व स्टॅम्प पेपर मात्र मुद्रांक विक्रेत्यांकडे उपलब्ध होत नसल्याने गोरगरीब जनतेला वेठीस धरत मनमानी कारभार चालविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्टॅम्प पेपर विक्रेत्यांच्या दुकानातच झेरॉक्स टायपिंगचे दस्तावेज बनविण्याची सक्ती लाभार्थ्याला केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत विविध प्रशासकीय विभागाना निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सदर निधी हा इतर विभागाच्या योजनांसाठी हा पुरक निधी म्हणून देण्यात येतो. ग्रामीण किंवा शहरी भागात नागरीकांना पायाभूत सुविधा शासनाच्या वेगवगळया विभागाकडून उपलब्ध करून दिल्या जातात.
(२), (३) व (४) महसूल व वन विभाग, अधिसुचना क्रमांक मुद्रांक-२००४/१६३६/प्र.क्र.४३६/म-१ दिनांक ०१/०७/२००४ नुसार जात प्रमाणपत्र/ उत्पन्न प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र/ राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची १ मधील अनुच्छेद ४ अन्वये आकारण्यायोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ करण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना याकरीता मुद्रांक शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

डहाणू तालुक्यासाठी सध्या तीन मुद्रांक विक्रेते असून त्यापैकी दोन मुद्रांक विक्रेते तहसिल कार्यालयात व एक मुद्रांक विक्रेता मसोली गावात मुद्रांक विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्यापैकी दुय्यम निबंधक डहाणू यांचे अहवालानुसार श्री.सुर्यकांत नारायण मेहेर, मुद्रांक विक्रेता यांचे कामकाजात अनियमितता आढळल्याने त्यांचा मुद्रांक विक्री परवाना सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक २०/११/२०२३ रोजीच्या आदेशाने तात्पुरता आदेशान्वये निलंबित केलेला आहे.

तसेच, श्री.रामदास हरिशचंद्र तांडेल, मुद्रांक विक्रेता हे दिनांक १३/१०/२०२३ रोजी मुद्रांक विक्रीच्या ठिकाणी गैरहजर असल्याचे तहसिलदार, तलासरी यांनी कळविल्याने सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या दिनांक २०/११/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मुद्रांक विक्रेता यांना त्याबाबत समज दिली आहे.

जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर व उपकोषागार अधिकारी, डहाणू कार्यालयांशी मुद्रांक जिल्हाधिकारी पालघर यांचेशी संपर्क साधला असता दोन्ही स्तरांवर (पालघर जिल्हा व डहाणू तालुका) १००/- व ५००/- रुपयांचे स्टॅम्प पेपर बाबत कोणताही तुडवडा नसून कामे सुरळीतपणे चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ शेतकऱ्यांना न मिळाल्याबाबत

**(२९)** * **२२२७० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने केंद्र शासनाच्या पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील येथील ११,७५४ लाभार्थ्यांना शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजना लाभ मिळाला नसल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान निधी वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) नमो शेतकरी महासन्मान निधी योजना दिनांक १५ जून, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असून केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेंतर्गत लाभ प्राप्त झालेले लाभार्थी सदर योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत.

पी. एम. किसान योजनेचा १४ वा हप्ता वितरीत झालेल्या राज्यातील एकूण ८५.६० लाख लाभार्थींची यादी केंद्र शासनाकडून उपलब्ध करून घेण्यात आली व सदर यादीतील लाभार्थींना मा.पंतप्रधान महोदयांच्या हस्ते शिर्डी येथून दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी दुपारी ३.४५ वा. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आला. त्यामध्ये जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील ८८३५ लाभार्थींचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पापलेट माशाला हमी भाव मिळण्याबाबत

**(३०)** * **२२५६५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पापलेटला राज्य मासा हा दर्जा मिळाला असून या माशाला योग्य दर मिळत नसल्यामुळे मच्छीमारांच्या पदरी मात्र निराशाच पडत असून मच्छीमारांनी पापलेटला शेतमालाप्रमाणे हमी भाव मिळण्याबाबतची मागणी शासनाकडे केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दरम्यान वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापाऱ्यांनी पापलेटचे दर पाडल्यामुळे मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून एकीकडे समुद्रात पापलेट मिळत नसताना दुसरीकडे दर कमी झाल्याने मच्छीमार हवालदील झाले असल्याने पापलेटला अन्य शेतीमालाप्रमाणेच हमीभाव निश्चित करावा या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) महाराष्ट्र सागरी जलधी क्षेत्रातील सिल्व्हर पॉमफ्रेट या माशास "राज्य मासा" म्हणून दिनांक ०५/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे. राज्यातील सिल्व्हर पॉमफ्रेटच्या मत्स्योत्पादनामध्ये मागील काही वर्षामध्ये विशेष घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब लक्षात घेता, महाराष्ट्र सागरी जलधी क्षेत्रातील सिल्व्हर पॉमफ्रेट या उल्लेखनीय मत्स्य प्रजातीचे जतन करण्यासोबतच, सागरी परिसंस्थेचे रक्षण, लहान मासळीच्या मासेमारीला आळा घालणे आणि शाश्वत मासेमारी पध्दतीने प्रोत्साहन देण्याच्या महत्वपूर्ण गरजेबाबत जागरूकता वाढविणे इ. बाबींमुळे राज्यात सिल्व्हर पॉमफ्रेट या माशाला "राज्य मासा" म्हणून घोषित करण्यात आला आहे. यामुळे सिल्व्हर पॉमफ्रेटच्या उत्पादनामध्ये वाढ होणार आहे. सद्य:स्थितीत माश्यांच्या बाबत हमीभाव देण्याचे शासनाचे धोरण नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गायगोठा योजनेच्या अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळणेबाबत

**(३१) * २१६२१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुग्ध व्यवसायातून शेतकऱ्यांची भरभराट व्हावी म्हणून गाय गोठा अनुदान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या जनावरांसाठी चांगला निवारा मिळावा या उद्देशाने शेड बांधण्यासाठी आर्थिक अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे स्थलांतर थांबून स्थानिक पातळीवर रोजगार मिळावा यासाठी कुशल व अकुशल खर्चाची तरतूद करून गाय गोठा योजनेची अंमलबजावणी मनरेगा विभागामार्फत संपूर्ण राज्यात करण्यात येत असून या योजनेकडे मोखाडा (जि.पालघर) पंचायत समितीच्या मनरेगा विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याने अनेक गाय गोठा योजनेचे लाभार्थी वर्षभरापासून अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोखाड्यातील सदर योजनेकडे मनरेगा विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याने ८० लाभार्थ्यांपैकी केवळ दोन लाभार्थ्यांना अनुदान मंजूर झाले असून तर ६९ लाभार्थी अनुदानाच्या प्रतिक्षेत व उर्वरित नऊ लाभार्थ्यांबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोखाडा या आदिवासी बहुल तालुक्यातील आदिवासी नागरिकांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन करताना या जनावरांचे ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण करताना अनुदानाअभावी शेतकऱ्यांसमोर असंख्य अडचणी निर्माण होत असतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मोखाडा (जि.पालघर) तालुक्यासह राज्यातील गरजू शेतकरी गाय गोठा अनुदान योजनेचा लाभ मिळण्याकरीता शासन स्तरावर कोणती कार्यवाही, उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासींनी वनजमिनीवर बांधकाम अथवा भात लागवड केल्यास वन विभागाचे अधिकारी कारवाई करित असल्याबाबत

**(३२) * २१६७९ श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण भागातील आदिवासींनी वनजमिनीवर बांधकाम अथवा भात लागवड केल्यास वन विभागाचे अधिकारी तात्काळ जेसीबी लावून कारवाई करीत असून सदर तालुक्यात वनजमिनीवर साकव, रस्ते, घरे, मंदिर, फार्महाऊस बांधणाऱ्यांवर कोणत्याच प्रकारची कारवाई केली जात नसल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना उमटली असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुरबाडमध्ये सुरु असलेल्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी शासनाने दोषींवर गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त प्रकरणाची चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड (पूर्व) वनपरिक्षेत्रातील संरक्षित वन सर्व्हे क्र. १३९ चे क्षेत्रात दिनांक १६/०३/२०२३ व दिनांक १७/०३/२०२३ च्या दरम्यान अनधिकृतपणे सिमेंट काँक्रीट साकवचे बांधकाम झाले असल्याचे आढळून आले आहे.

वन विभागाच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे तोडण्याबाबतची मागणी अन्याय अत्याचार निमुर्लन समिती यांनी दिनांक १२/०५/२०२३ च्या निवेदनान्वये केली आहे. अनधिकृत सिमेंट काँक्रीट साकव बांधकाम प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये रौ.गु.नं.४/ई/२०२२-२३, दिनांक १८/०३/२०२३ रोजी प्रथम गुन्हा नोंदविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अतिवृष्टी व चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबत

**(३३) * २१५२३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात दिनांक २१ व २२ जुलै, २०२३ रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुराच्या तडाख्यात जिल्ह्यातील २ लाख ५ हजार ५४० शेतकऱ्यांचे १ लाख ६८ हजार ९३७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून सदर पीक नुकसानीचा अहवाल विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात येऊनही शेतकऱ्यांना नुकसानीची रक्कम अद्याप शासनाकडून मंजूर करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास जून-जुलै, २०२३ या दोन महिन्यांच्या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी, चक्रीवादळ यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १ हजार ७१ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याच्या दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे केवळ अमरावती व औरंगाबाद विभागातील ११ जिल्ह्यांना नुकसान भरपाई देण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा, माळशिरस व इतर तालुक्यातही सदर अतिवृष्टी व चक्रीवादळामुळे नुकसान झाले असून प्रशासनाने त्याचे पंचनामे करून नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अकोला जिल्ह्यात दिनांक २१ व २२ जुलै, २०२३ रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे २००५७१ शेतकऱ्यांच्या बाधित १६४५५८.८४ हे.आर क्षेत्राकरीता विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक ०३/१०/२०२३ अन्वये अकोला जिल्ह्याकरीता रुपये १४४२८.८११ लक्ष इतक्या निधी वितरणास मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) सोलापूर जिल्ह्यातील जून, २०२३ मधील अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडुन प्राप्त प्रस्तावानुसार २८१७ शेतकऱ्यांच्या १७४३.८४ हेक्टर बाधित क्षेत्राकरीता रुपये ३९०.१९ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक ३०/११/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील पिकांचे वन्य प्राण्यांकडून नुकसान होत असल्याबाबत

**(३४) * २२३२१ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील चिकणी, जामणी, दहेगाव, पडेगाव, सेलसुरा, सोनेगाव, डिगडोह, केळापूरसह परिसरातील कापूस, सोयाबिन, तूर या पिकावर रोही, रानडुक्कर, वानर आदी वन्यप्राण्याच्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असून सदर वन्य प्राण्यांच्या बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपरोक्त प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत तसेच वन्य प्राण्याचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) वर्धा वन परिक्षेत्राअंतर्गत देवळी तालुक्यातील चिकणी, जामणी, दहेगाव, पडेगाव, सेलसुरा, सोनेगाव, डिगडोह, केळापूर या गावांमध्ये माहे सप्टेंबर, २०२३ च्या सुमारास वन्यप्राण्यांमुळे झालेल्या शेतपीक नुकसानीच्या एकूण ४२ प्रकरणांमध्ये रुपये ३.०१ लक्ष नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

वन्यप्राण्यांकडून फळझाडांचे नुकसान झाल्यास संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस द्यावयाचे दरांमध्ये शासन निर्णय, दिनांक २२/०९/२०२३ अन्वये वाढ करण्यात आली असून शेतपिकांकरीता नुकसान भरपाईचे दर वाढविण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे.

नुकसान भरपाईचे तात्काळ अदा करण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर उणे प्राधिकाराची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे जेणेकरुन अनुदान प्राप्त होण्याची वाट न पाहता संबंधितास नुकसान भरपाई तात्काळ अदा करणे शक्य होईल.

या सोबतच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याकरीता विभागाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- वन्यप्राण्यांकरीता वनक्षेत्रात पिण्याच्या पाण्याची सोय करण्याच्यादृष्टीने पाणवठे निर्माण करणे व खाद्य उपलब्ध होण्यासाठी कुरण विकासाची कामे करणे.
- डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत पिकांचे संरक्षण करण्याकरीता सौर ऊर्जा कुंपण उपलब्ध करुन देणे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी खरीप हंगामातील कर्जपुरवठ्यापासून वंचित असल्याबाबत

**(३५) * २२१८३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यस्तरीय बँकर्स कमिटीने यंदाच्या खरीप हंगामात राज्यातील ५४ लाख २३ हजार शेतकऱ्यांना ५१ हजार ६३७ कोटी रुपयांच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट दिले होते, परंतु केवळ ३५ हजार ९८ कोटी एवढे कर्जवाटप झालेले असून दुष्काळसदृश्य परिस्थितीचा अंदाज घेऊन बहुतांश बँकांनी कर्जवाटप बंद केले असून राज्यातील सुमारे १८ लाख शेतकरी कर्जापासून वंचित राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांनी कर्जवाटप बंद करण्यामागील कारणे काय आहेत, राज्यात यावर्षी सरासरीच्या तुलनेत ५५ ते ६० टक्के पाऊस कमी झाल्याने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्ज वितरित करण्याकरीता बँकाना निर्देश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) राज्य स्तरीय बँकर्स समितीमार्फत सन २०२३-२४ मध्ये राज्यासाठी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक रुपये ७२,३४७ कोटी इतका आहे. यापैकी खरीप हंगामासाठी रुपये ५१,५६५ कोटी व रब्बी हंगामासाठी रुपये रुपये २०,७८२ कोटी इतका लक्षांक देण्यात आला आहे.

त्यानुसार राज्यातील सर्व बँकांनी खरीप हंगाम अखेर दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत ४२.०४ लाख शेतकऱ्यांना रुपये ४१,२२१ कोटी इतक्या रकमेचे कर्जवाटप केले आहे (लक्षांकाच्या ८५ टक्के).

तसेच राज्यातील सर्व बँकांनी रब्बी लक्षांकापैकी दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ अखेर एकूण २.०५ लाख शेतकऱ्यांना रुपये २६०३ कोटी रकमेचे वाटप केले असून रब्बी हंगामाचे कर्जवाटप अजुनही सुरु आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्हा प्रशासनाकडून पीककर्ज वाटपाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच तालुकास्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) येथे फणस संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३६) * २१७०३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत वेंगुर्ला येथे प्रादेशिक फळ संशोधन केंद्र कार्यरत असून फणस या फळपिकाकरीता अद्यापही स्वतंत्र फळ संशोधन केंद्र अस्तित्वात नसल्याने लांजा येथे एक स्वतंत्र व अत्याधुनिक असे फणस संशोधन केंद्र स्थापन करण्याची विनंती लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फणस या फळापासून विविध मूल्यवर्धित पदार्थ बनविण्यासाठी आवश्यक अन्न प्रक्रिया, साठवणूक आणि हाताळणी पध्दती यावर संशोधन केल्यास कोकणातील फणस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होवून त्यांना उत्पन्नाचा एक पर्यायी स्त्रोत तसेच कृषी क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध निर्माण होवू शकतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लांजा येथे फणस संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातंर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे कार्यरत आहे. या संशोधन केंद्रात सद्य:स्थितीत फणस या फळपिकावर संशोधन करण्यात येत असून, या केंद्रामार्फत कोकण प्रॉलिफिक या वाणाची शिफारस विद्यापीठाने लागवडीसाठी केली आहे. सदर संशोधन केंद्रामार्फत फणस या फळपिकावर संशोधन केंद्राचे कार्य सुरु असल्याने, स्वतंत्र फणस संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत दापोली कृषी विद्यापीठ व महाराष्ट्र कृषी परिषदेने शासनास शिफारस केलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महसूल विभागातील अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत

**(३७) * २१५२८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या महसूल विभागाच्या सहा विभागांतर्गत अनुसूचित जमातीच्या आरक्षित जागेवर सन १९८६ ते २०१० पर्यंत पदोन्नती देण्यात आलेल्या १०४ अधिकाऱ्यांकडे जातवैधता प्रमाणपत्र नसतानाही केवळ १२ अधिकाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले असून अद्यापही ९२ अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अधिसंख्य पदावर वर्ग न झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्याची मागणी अमरावती विभागाचे ट्रायबल फोरमचे विभागीय अध्यक्ष यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, जात प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) महसूल विभागातील सहा विभागांतर्गत अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी आणि तहसिलदार या तीन संवर्गांसाठी मंजूर पदसंख्येपैकी एकूण १०४ पदे "अनुसुचित जमाती" या प्रवर्गासाठी राखीव आहेत. सदर पदांमध्ये सरळसेवा नियुक्ती आणि पदोन्नती या दोन्ही प्रकारच्या पदांचा समावेश आहे.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २१/०९/२०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले व इतर अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार शासन निर्णय क्र.ईसटी-२०२०/प्र.क्र.४/ई-८ दिनांक २७/०१/२०२० अन्वये महसूल विभागांतर्गत अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी आणि तहसिलदार या संवर्गातील १२ अधिकाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आल्या आहेत.

"अनुसुचित जमाती" प्रवर्गासाठी राखीव १०४ पदांपैकी ७४ पदे भरण्यात आली होती व ३० पदे रिक्त होती. सदर ७४ पदांपैकी ६४ अधिकाऱ्यांनी अ.ज. प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याने त्यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करण्याची आवश्यकता नाही. महसूल विभागाच्या दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये, सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेल्या सूचनांना अनुसरुन "अनुसुचित जमाती" प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या १० आणि जात वैधता प्रमाणपत्र अभावी सेवा समाप्त केलेल्या २ अशा एकूण १२ अधिकाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.

(२) व (३) सदर निवेदन शासनास प्राप्त झाले असल्याचे आढळून येत नाही. तथापि, अनुसूचित जमाती या राखीव प्रवर्गातून नियुक्ती प्राप्त ठरलेल्या आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकाऱ्यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २१/१२/२०१९ आणि दिनांक १४/१०/२०२२ द्वारे विहित तरतूदींना अनुसरुन त्यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहकारी संस्थांमध्ये मागासवर्गीय पदे रिक्त ठेवून अन्याय केला जात असल्याबाबत

**(३८) * २२२२७ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सहकारी संस्थांमध्ये सामाजिक समतोल राखण्याच्या हेतूने अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ठेवण्याचा नियम असून सहकारी संस्थांकडून सदर नियमाचे पालन होणेबाबत दक्ष राहण्याचे तसेच या प्रकरणी काही नियमबाह्य घडत असल्यास त्याबाबत दाखल झालेल्या तक्रारीवर न्याय निवाडा करण्याचे अधिकार संबंधित विभागाच्या निबंधक कार्यालयास प्राप्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या संस्थेतील मागासवर्गीयांची पदे रिक्त ठेवली असून यावर दाद मागणाऱ्यांना संबंधित विभागातील अधिकारी हे जुमानत नसून या प्रकरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार सुरु असल्याच्या तक्रारी देखील प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात असलेल्या आर-पूर्व विभागात कार्यरत उपनिबंधक व विभागीय सह निबंधक हे जाणीवपूर्वक अशा प्रकरणांकडे दुर्लक्ष करीत असून काही प्रकरणात सुमारे १० वर्षे झालेली असतानादेखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही ही बाब काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व स्थानिक गृहनिर्माण संस्थेतील रहीवाशानी मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री महोदयांच्या निदर्शनास माहे ऑक्टोबर, २०२३ वा त्यादरम्यान रहिवाशांनी आणून दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी मुंबई शहरात असलेल्या आर-पूर्व विभागात कार्यरत उपनिबंधक व विभागीय सह निबंधक यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, हे अशंतः खरे आहे.
(२) होय, हे अशंतः खरे आहे.
(३) मुंबई विभागात जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातील उपनिबंधक, पी विभाग व आर दक्षिण विभागाकडे सहकारी संस्थांमध्ये मागासवर्गीय सभासदांची पदे रिक्त ठेवून अन्याय केला जात असल्याबाबतची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतु, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-उत्तर विभाग, मुंबई यांचे कार्यालयाकडे श्रीमती रेश्मा चक्रबोर्ती यांनी राजशिवम को. ऑप. हौसिंग सोसा. लि., शिव वल्लभ रोड, अशोक वन, दहिसर (पुर्व), मुंबई-६८ या संस्थेबाबत दिनांक २३/०५/२०२३ रोजी तक्रार दाखल केलेली आहे.
(४) राजशिवम को. ऑप हौसिंग सोसायटी लि. या संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुकीची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी श्री.संदीप गुप्ते यांनी पार पाडलेली असून त्यांची नियुक्ती संस्थेचे मागील चेअरमन व सेक्रेटरी यांनी केलेली आहे. निवडणूकीनंतर विद्यमान व्यवस्थापक समिती गठीत झालेली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी श्री.संदिप गुप्ते यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन संस्थेच्या निवडणूकीत सभासदांनी राखीव जागेसाठी अर्ज केल्याचे दिसून येत नाही. राखीव जागेसाठी सभासदांनी नामनिर्देशन अर्ज दाखल न केल्याने सध्याचे व्यवस्थापक समितीतील राखीव जागा रिक्त राहिलेल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेतील वादाबाबत निर्णय करण्याचे अधिकार उपनिबंधक कार्यालयास नसून अर्जदार यांना निवडणूक प्रक्रियेबाबत वाद असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१ अन्वये मा.सहकार न्यायालयात दाद मागणे योग्य होईल. असे तक्रारदार यांना दिनांक २८/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर येथील तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(३९) * २२५४८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १९९६९ ला दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय यांचे लेखापरीक्षणात शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करून सन २०१६ ते २०२० या कालावधीत सुमारे सोळा कोटीहून अधिक शासकीय रकमेचा अपहार केला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यालय प्रमुख तथा जिल्हाधिकारी यांनी ८४ महिन्यातून किमान एक वेळेस रोकड वही, बँक खाते वही व रोख रक्कम यांची पडताळणी करून शेरा/अहवाल रोकड वहीत लिहिणे बंधनकारक असताना देखील तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे कार्यकाळात पडताळणीस ८४ महिने विलंब केलेल्याबाबत तसेच लेखा परीक्षण केले नसल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी यांचेवर शासनाने कोणतीही कारवाई केली, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी कर्मचारी व अधिकाऱ्यांचा यांच्याविरुध्द संयुक्त विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे काय, विभागीय चौकशीचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय, नसल्यास, सदर चौकशी अहवाल कधी पर्यंत सादर करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसिलदार (सर्वसाधारण) यांच्या बँक खात्यातून रुपये २२,८७,६२,०२५/- इतक्या रकमेचा अपहार लेखा शाखेतील तत्कालीन रोखपाल तथा अव्वल कारकून मनोज नागनाथ फुलेबोयणे, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांनी केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ अखेरीस निदर्शनास आले आहे. सदरबाबत मनोज नागनाथ फुलेबोयणे व इतर ३ खाजगी व्यक्ती यांच्याविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाणे, लातूर येथे गु.र.क्र.४३/२०२३ दिनांक २१/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्यमंत्री सहायता निधी, लातूर या बँक खात्यातून एकूण रुपये ३५,००,०००/- रकमेच्या अपहार केल्याबाबत मनोज नागनाथ फुलेबोयणे व इतर ३ खाजगी व्यक्ती यांचेविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाणे, लातूर गु.र.नं.७७/२०२३, दिनांक ०५/०२/२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त नमूद दोन्ही गुन्ह्यात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत सदर अनियमिततेची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे. सदर त्रिसदस्यीय समितीने या संदर्भात अहवाल विभागीय आयुक्तांना सादर केला असून त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २४/०२/२०२३ अन्वये शासनास अहवाल सादर केला आहे. सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या संबंधित तत्कालीन आहरण व संवितरण अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. त्या अनुषंगाने शासनाने ६ तहसिलदार व १ अव्वल कारकून (आरोपी) यांच्याविरुध्द दिनांक २५/०९/२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ८ व १२ नुसार विभागीय चौकशी सुरु केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(४०) * २१९७० श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुलै, २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रायगड जिल्ह्यातील ९२५ गावांमधील २४ हजार ९७७ शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला असून ९ हजार ८५५ हेक्टर भात पीक बाधित झाले असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व कृषी विभागाने झालेल्या नुकसानीचे पंचमाने करुन त्याबाबतचा अहवाल माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये रायगड जिल्हा प्रशासनाकडून मा.आयुक्त, कृषी, पुणे, मा.प्रधान सचिव, कृषी विभाग व मा.अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय येथे पाठविण्यात आला असून त्याअन्वये सुमारे आठ कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाधिन मागणीनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम वितरीत करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) जुलै, २०२३ मध्ये रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता शासन निर्णय दिनांक ३०/११/२०२३ अन्वये रुपये ८४७.१४ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामदेवबाबा विद्यापीठाला कोट्यवधी रुपयांची करमाफी देण्याच्या निर्णयाबाबत

**(४१) * २१६१७ श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात विविध संस्थांना दिलेल्या कब्जेहक्काच्या जमिनीच्या अनर्जित कराच्या माध्यमातून रूपये ४५०० कोटी महसुलाचे उद्दिष्ट असताना माहे ऑगस्ट, २०२३ पर्यंत केवळ रुपये ५७७ कोटींचा जमीन महसूल जमा झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील रामदेवबाबा सार्वजनिक समितीला १० टक्के रक्कम भरण्यास सूट दिल्यास शासनाचे आर्थिक नुकसान होणार असल्याने राज्याच्या वित्त आणि महसूल विभागाने आक्षेप घेतलेले असतानाही माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत रामदेवबाबा विद्यापीठाला १३ कोटी ५८ लाख रुपयांची करमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्हाधिकाऱ्यांचे १३ कोटी ५८ लाख ३५ हजार रुपयांच्या वसूलीचे आदेशही रद्द करण्याचे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वित्त व महसूल विभागाचे उक्त करमाफी संदर्भातील आक्षेप डावलून रामदेवबाबा विद्यापीठाला करमाफी देण्याची कारणे काय आहेत,
(५) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रामदेवबाबा विद्यापीठाला १३ कोटी ५८ लाख रुपयांची करमाफी देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) कब्जेहक्काच्या जमिनीच्या अनर्जित करासाठी स्वतंत्र महसूलाचे उद्दिष्ट निश्चित करून दिले जात नाही. तथापि, राज्याच्या एकूण महसूली उत्पन्नासाठी लेखाशीर्ष "००२९-जमीन महसूल" यासाठी सन २०२३-२४ करीता एकूण रुपये ४४९५.१० कोटी इतके महसूलाचे उद्दिष्ट ठरवून दिले असून, माहे ऑगस्ट, २०२३ पर्यंत रुपये ७६५.९१ कोटी इतका महसूल जमा झालेला आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

रामदेवबाबा सार्वजनिक समिती नागपूर या प्रायोजक मंडळामार्फत रामदेवबाबा विद्यापीठ, नागपूर हे स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन होताना जमिनीचे हस्तांतरण होत नसलेने नजराणा रक्कम आकारणे योग्य होणार नाही, असे महसूल विभागाचे अभिप्राय, तसेच स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या अधिनियमामध्ये जमीन अथवा मत्ता विद्यापीठाच्या नावे करण्याबाबत तरतूद नसल्याचे विधि व न्याय विभागाचे अभिप्राय आणि प्रायोजक मंडळ हे विद्यापीठाच्या नावे जमिनीचे हस्तांतरण करणार नसल्याने या प्रकरणी १० टक्के अनर्जित रक्कम लागू होणार नसल्याबाबत मंत्रीमंडळाने निर्णय घेतला.

मा.मंत्री मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने १० टक्के अनर्जित रक्कम लागू नसल्याबाबत सुधारीत शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(५) व (६) शासनस्तरावर निर्णय झाला असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील कयाधू नदी पात्रातून अवैध वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(४२) * २१४२९ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २०८१५ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात गत वर्षी एकही वाळू घाटाचा लिलाव झाला नसतानाही येथील कयाधू नदी पात्रातून ट्रॅक्टर व इतर वाहनांच्या मदतीने अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरुच असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध वाळू उपसा व वाहतूक रात्रीच्या वेळेला होत असून शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असून रस्तेही खराब होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथील अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखून येथील वाळू माफीयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) हिंगोली जिल्ह्यात जिल्हास्तरीय तसेच तालुका निहाय भरारी पथके तयार करण्यात आले असून भरारी पथकामार्फत वेळो-वेळी कार्यवाही करून वाळुचे अवैध उपसा व वाहतूक करणाऱ्या वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

कळमनुरी तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यासाठी ०७ पथके तयार करण्यात आली असून त्यांच्यामार्फत अवैध गौण खनिज वाहतूक करताना आढळून येणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

कळमनुरी तालुक्यात माहे एप्रिल, २०२३ ते माहे ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत महसूल व पोलीस प्रशासनाकडून तालुक्यातील व बाहेर जिल्ह्यातून तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्या १२ वाहनांवर रुपये १९.०९ लक्ष एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, सदर वाहनातुन जप्त करण्यात आलेला ४३ ब्रास रेती साठा घरकुल धारकांना देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील सहाय्यक वनसंरक्षकांच्या २०७ रिक्त जागा भरण्याबाबत

**(४३) * २१६९५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदळवन तसेच वनांचे रक्षण करण्यासाठी या खात्यासाठी आवश्यक असलेले अधिकाऱ्यांचे मनुष्यबळ अतिशय कमी असून राज्यात सहाय्यक वनसंरक्षकांच्या २८९ पदांपैकी फक्त ८२ पदे भरली आहेत तर २०७ पदे रिक्त असून सर्व रिक्त पदे भरण्याबाबत प्रधान सचिव, वन विभाग यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) वनक्षेत्रपालांच्या सरळसेवा भरतीबाबत तसेच सेवाजेष्ठतेसंदर्भात शासनाने चार महिन्यात अंतिम सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिध्द करणे आवश्यक असूनही तसे लेखी आश्वासन शासनाने देऊनही सेवा जेष्ठतेबाबत अद्यापि कोणताही निर्णय झालेला नसून गेल्या तीन वर्षात पदोन्नती समितीची एकही बैठक न झाल्याने प्रशासनाविरोधात अधिकाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहाय्यक वनसंरक्षकांची रिक्त असलेली २०७ पदे भरण्याबाबत शासन कोणती ठोस कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

सहायक वनसंरक्षक संवर्गाच्या एकूण २८९ मंजूर पदांपैकी ११५ पदे भरलेली आहेत. उर्वरीत १७४ रिक्त पदांमधील सरळसेवेची ३२ पदे भरण्यासाठी मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात येत आहे. तसेच पदोन्नती कोट्यातील रिक्त १४२ पदे भरण्यासाठी निम्न संवर्गाची माहिती प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांच्या दिनांक २६/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

वन विभागातील वनक्षेत्रपालांची ९९१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८७१ पदे भरलेली असून १२० पदे रिक्त आहेत.

वनक्षेत्रपाल संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२३ अखेरची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी दिनांक २३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपवनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन), नागपूर यांनी प्रसिध्द केली आहे. सदर विषयी मा.न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालयामध्ये विविध न्यायालयीन प्रकरणे उपस्थित झाली आहेत.

(३) सहायक वनसंरक्षक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी वनक्षेत्रपाल संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२३ अखेरच्या तात्पुरत्या सेवाज्येष्ठता यादीनंतर अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर तात्काळ विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात येईल.

(४) प्रश्न उपस्थित होत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील ५३५ ग्रामपंचायतींच्या स्तरावरील वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण झाले नसल्याबाबत

**(४४) * २१७५९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळ्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायती व विविध यंत्रणांमार्फत वृक्ष लागवड करण्यात येत असून अकोला जिल्ह्यातील ५३५ ग्रामपंचायतीच्या स्तरावर ५ लाख ३५ हजार वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट देण्यात आले असताना आतापर्यंत फक्त ५१ हजार ६०० इतक्या कमी प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुर्तीजापुर, बाळापुर, अकोट व तेल्हारा या चार तालुक्यांतील ग्रामपंचायतींकडून वृक्ष लागवड करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) अकोला जिल्ह्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यातील ५३५ ग्रामपंचायती मध्ये सन २०२३-२४ च्या पावसाळ्यात (जुलै, २०२३) प्रती ग्रामपंचायत १००० वृक्षलागवड प्रमाणे ५ लाख ३५ हजाराचे नियोजनाचे उद्दिष्ट जि.प.अकोला मार्फत देण्यात आलेले होते. त्यानुसार आतापर्यंत ग्रामपंचायती मार्फत ७३ हजार ८०० इतकी वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे.

(२) अकोला जिल्ह्यामध्ये सन २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायतस्तरावर अकोट व तेल्हारा तालुक्यातील ग्रामपंचायतीकडून वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही आहे, तर मुर्तीजापुर मध्ये ०२ व बाळापुर मध्ये ०३ ग्रामपंचायतीव्दारे आतापर्यंत वृक्षलागवड करण्यात आलेली आहे.

(३) अकोला जिल्ह्यातील सन २०२३-२४ मधील वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरीता जि.प.अकोला मार्फत सर्व गट विकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या असून ग्रामपंचायतस्तरावरील शाळा परीसर व इतर ठिकाणी वृक्ष लागवड करण्याबाबतची उपाय योजना करण्यात येत आहे.
(४) सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीयकृत बँकाच्या जाचक अटीमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीतील प्रोत्साहन अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(४५) * २२१४७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील राष्ट्रीयकृत बँकाच्या अतिरीक्त निकषांमुळे महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत कर्जाची नियमित परतफेड करणारे सुमारे सव्वा लाख शेतकरी शासनाच्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात ७१ हजार २१८ ऑनलाईन करण्यात आलेल्या कर्जखात्यांपैकी ३५ हजार ५०३ शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले असून ३५७१५ कर्जखाती प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता आणि कर्जमाफीवरील रक्कम दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत देण्यात येईल असे मा.कृषी मंत्री यांनी विधानसभा सभागृहात घोषित केले, परंतु त्यानंतर रक्कम सन २०२३ च्या दिवाळीपर्यंत देण्यात येईल असेही घोषित केलेले असून, शेतकऱ्यांना अद्यापही रक्कम मिळाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील व विशेषत: सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) नाही हे खरे नाही.
(४) सदर योजनेच्या निकषानूसार प्राथमिकदृष्टया पात्र ठरलेल्या राज्यातील एकूण १५.४४ लाख कर्जखात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला आहे. त्यापैकी १५.११ लाख कर्ज खात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे. त्यापैकी एकूण १४.२८ लाख कर्जखात्यांना रुपये ५१८० कोटी रकमेचा लाभ प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत कर्जखात्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

सदर योजनेच्या निकषानूसार प्राथमिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या सोलापूर जिल्ह्यातील एकूण ३९,५११ खात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला असून त्यापैकी ३८,९४८ कर्जदारांनी आधार प्रमाणिकरण केले आहे. त्यापैकी ३७,३७१ कर्जखात्यांना रुपये १६७.०४ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या उर्वरीत कर्जदारांना लाभ देण्यासाठीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण प्रयोगशाळा उभारण्याबाबत

**(४६) * २१७०९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती उत्पादित शेतमालाच्या प्रमाणीकरणासाठी पायाभुत सुविधा, विक्री व्यवस्थापन व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने तसेच शेतमालाला देशात तसेच परदेशात बाजारपेठ उपलब्ध होऊन चांगला भाव मिळावा याकरीता शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७२०/प्र.क्र.४७/१ अे, दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ अन्वये अकोला येथे महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणीकरण संस्था तसेच पुणे, नागपूर, कोल्हापूर, अकोला, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, नाशिक, लातूर या ठिकाणी सदरहू संस्थेची क्षेत्रिय कार्यालये स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निर्णयान्वये केवळ ८ ठिकाणीच क्षेत्रिय कार्यालयाची उभारणी करण्यात आली असून ही व्यवस्था अत्यंत त्रोटक स्वरूपाची असल्याने राज्यातील काही भागातील शेतकऱ्यांना नाईलाजाने खाजगी प्रमाणिकरण संस्थांमार्फत शेतमालाचे प्रमाणिकरण करून घ्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाब ही खर्चिक असल्याने शासनाने ज्या उद्देशाने राज्यात सेंद्रिय प्रमाणिकरण संस्थेची स्थापना केली त्याचा लाभ राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना मिळत नसल्याने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण प्रयोगशाळा उभारण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.उप मुख्यमंत्री तसेच मा.कृषी मंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण प्रयोगशाळा उभारण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय असून याबाबतची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सेंद्रिय उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना अपेडा मार्फत NPOP (National Programme for Organic Production) मानकानुसार प्रमाणिकरण करणे बंधनकारक नाही. मात्र शेतकऱ्यांना सेंद्रिय उत्पादनाची निर्यात करावयाची असल्यास अपेडा संस्थेची मान्यता प्राप्त असलेल्या संस्थेद्वारे प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. देशाअंतर्गत बाजारपेठेत सेंद्रिय उत्पादने विक्री करावयाची असल्यास PGS-INDIA व जिल्हा स्तरावरील आत्माअंतर्गत सेंद्रिय उत्पादनाचे प्रमाणिकरण करण्याचा पर्याय सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध आहे.

(३) अंशत: खरे आहे.
(४) सद्य:स्थितीत सेंद्रिय उत्पादने स्थानिक बाजार पेठेत विक्री करण्याकरीता प्रत्येक जिल्ह्यामध्ये कृषी विभाग (आत्मा) यांना RC (Regional Council) म्हणून मान्यता असल्याने प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच PGS-INDIA अंतर्गत सेंद्रिय उत्पादनाचे प्रमाणिकरण करण्याचा पर्याय सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध आहे.

महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणेला अपेडा संस्थेची मान्यता मिळाल्यानंतर सदर यंत्रणेमार्फत सेंद्रिय प्रमाणिकरणाकरीता Online अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागातील कृषी अधिकारी/विभागीय निरीक्षक अर्जाप्रमाणे प्रत्यक्ष जिल्हा/तालुका/गाव पातळीवर जाऊन तपासणीचे काम पूर्ण करेल. तसेच यंत्रणेकडे सेंद्रिय प्रमाणिकरणाचे क्षेत्रात, ज्या जिल्ह्यामध्ये सेंद्रिय क्षेत्रात वाढ होईल त्या ठिकाणी अतिरिक्त तांत्रिक अधिकारी/कर्मचारी आवश्यकतेनुसार नेमून तपासणीचे काम पूर्ण करता येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४७)** * **२१५६४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२२-२३ या कालावधीत रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये १ कोटी ७३ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असून रुपये ९ कोटी ८२ लाखांची आर्थिक अनियमितता झाली असल्याचा ठपका कॅगने सादर केलेल्या अहवालामध्ये ठेवण्यात आल्याची बाब दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत अकुशल कामगारांना रोजगार मिळण्यासाठी केंद्र शासनाकडून रुपये २ हजार ४१७ कोटी तर राज्य शासनाकडून रुपये ५७४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये काही अधिकारी संगनमत करुन खोटी देयके सादर करुन मुल्यांकनापेक्षा जास्त रकमेची नोंद करुन, कामगारांच्या नोंदवहीमध्ये चुकीच्या व्यक्तींची नोंद करुन काम करणाऱ्या कामगारांची नोंद केली जात नसल्याच्या तक्रारींचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून करण्यात आलेल्या अपहाराची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे

प्रस्तुत बाब ही कॅगच्या अहवालात आली नसून मगांराग्रारोहयोच्या सामाजिक अंकेक्षण अहवालात निदर्शनात आलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे
(३) हे अंशत: खरे आहे
(४) संबंधित जिल्ह्यांकडून याबाबतचा अहवाल मागविण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी जनतेसाठी आद्य क्रांतिकारक “भगवान बिरसा मुंडा न्याय भवन” उभारणेबाबत**

**(४८) * २१६३० श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारित असलेले सर्व कार्यालये एकाच इमारतीत आणल्यास आदिवासी जनतेला शासकीय कामे करणे सोयीचे होणार असल्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या “डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या” धर्तीवर आदिवासी जनतेसाठी आद्य क्रांतिकारक “भगवान बिरसा मुंडा न्याय भवन” उभारण्यात यावे अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) महाराष्ट्रात आदिवासी समाजाच्या लोक परंपरेची व संस्कृतीची माहिती व महती लोकांपर्यंत पोहोचावी व आदिवासी संस्कृती जिवंत राहावी या हेतुने प्रत्येक जिल्ह्यात “आद्यक्रांतीकारक भगवान बिरसा मुंडा भवन” निर्मिती करण्यात यावी, अशा प्रकारचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक ११/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिले आहे.
(२) याबाबत तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.